**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ चा सरतपास सहा. सरकारी अभियोक्ता श्री.एस.आर कुलकर्णी यांचे मार्फत सुरुः–**

मी याद्वारे शपथेवर साक्ष देतो की,

माझे नावः – अनुसया मारोती गायकवाड,

वय – ७० वर्षे, व्यवसाय–मजुरी,

राहणार – रा.कोराळी , ता.निलंगा, जि. लातूर

मी आरोपीला ओळखते. साक्षीदाराने आरोपीकडे बोट दाखवुन तो आज न्यायालयात हजर असल्याचे सांगितले. घटनेला आठ वर्षे झाली. सिरसी रोडवर हत्तरगा मोड येथे घटना ११.०० वाजता घडली. सकाळी १०.०० वाजता मी, वामन गायकवाड, व्यंकट गायकवाड व नागिन गायकवाड असे आम्ही व्यंकट गायकवाड यांच्या ॲटोने मोगरगा येथे अंत्यविधीकरीता जात होतो. ॲटो व्यंकट गायकवाड चालवित होते. ११.०० वाजण्याच्या सुमारास टेम्पोने आमच्या ॲटोला धडक दिली. टेम्पो चालक वाहन वाकडे तिकडे जोराने चालवून आमच्या गाडीला धडक दिली. धडक दिल्यामुळे माझ्या तोंडाला, छातीला, गुडघ्याला मार लागला होता. तसेच नागिन गायकवाड व व्यंकट गायकवाड यांना देखील मार लागला होता. आम्हाला सिरसी येथील दवाखान्यात ॲडमिट केले. तेथून निलंगा येथे दवाखान्यात आणले. आमच्या गाडीला धडक देणारा आज न्यायालयात हजर आहे.

**सरतपास पुर्ण**

**उलटतपास आरोपी तर्फे अॅड. डी.एस.बिराजदार यांच्यामार्फत शपथेवर सुरु –**

०२. आम्ही ॲटोच्या मागच्या सिटवर तिघेजण बसलो होतो. ड्रायव्हरच्या बाजुला कोणी बसले नव्हते. किती तारखेला घटना घडली ती

तारीख मला सांगता येत नाही. परंतु घटना होऊन आठवा वर्षे चालू आहे. हे म्हणणे खरे नाही की, घटना घडली तेव्हा कच्चा रोड, ओबडधोबड व खड्डयाचा रस्ता होता. ज्या गाडीने धडक दिली त्या गाडीचा नंबर मला सांगता येत नाही व आमच्याही गाडीचा नंबर सांगता येत नाही. साक्षीदार स्वतःहून सांगते की, मला लिहता वाचता येत नाही. हत्तरगा रोडवर गतिरोधक होता. वळणाच्या वेळी हात किंवा इंडिकेटर दाखवला होता का हे मला माहीत नाही. घटना एकदम हत्तरगामोडवरच झाली. ॲटोच्या डाव्या बाजुला धडक लागली. दवाखान्यात कोणी आाले हे मला लागलेले असल्यामुळे समजले नाही. घटनेनंतर अर्धा तास घटनास्थळी होते. दवाखान्यात किती वाजता गेलो ती वेळ माहिती नाही. डॉक्टरांनी उपचार करुन तीन दिवस ठेऊन घेऊन मग पाठवून दिले. पोलीसांनी माझा बयान दवाखान्यात दुसऱ्या दिवशी घेतलेला. फिर्याद देण्यासाठी कोण गेले होते हे मला माहीत नाही. हे म्हणणे खरे नाही की, व्यंकटच्या नावे लायसन्स नाही, त्याला गाडी चालवता येत नाही, खड्डयाचा रस्ता असल्यामुळे व व्यंकटच्या चुकीमुळे घटना घडलेली आहे. हे म्हणणे खरे नाही की, मी खोटी साक्ष देत आहे.

**उलटतपास पुर्ण**

**फेरतपास नाही.**

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by KOMAL PRAMOD GADE
Date: 2026.07.07 17:41:46 +0530

(**श्रीमती.के.पी.गाडे**)

दिनांक–०७/०७/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्र.२), निलंगा